पुढारी

# ‘स्कॉलर्स’, ‘वॉरियर्स’ना एकत्र आणायचा प्रयत्न

## एअरमार्शल ए. बी. देव यांची माहिती

**पुणे : ‘हवाई दल आणि शैक्षणिक क्षेत्रासह विविध विषयातील तज्ज्ञांची सांगड घालण्यासाठी हवाई दल पुढाकार घेत आहे. त्यातून समाजातील ‘स्कॉलर्स’व हवाई दलाच्या ‘वॉरियर्स’ना एकत्र आणायचा प्रयत्न आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्थापन होणारे मार्शल ऑफ एअर फोर्स अर्जन सिंग अध्यासन ही त्याची पहिली पायरी आहे. भविष्यात अशी आणखी काही अध्यासने, संशोधन संस्था सुरू करण्यात येतील,’ अशी माहिती एअर मार्शल ए. बी. देव यांनी शनिवारी दिली.**



विद्यापीठात स्थापन झालेल्या मार्शल ऑफ एअरफोर्स अर्जन सिंग अध्यासनाच्या सामंजस्य करारावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एअरमार्शल ए. बी. देव यांसह अन्य मान्यवर.

### राफेल मे महिन्यात दाखल

हवाई दलाने फ्रान्सकडून खरेदी केलेल्या राफेल विमानांवर हवाई दलाचे वैमानिक, सैनिकांचे प्रशिक्षण सध्या फ्रान्समध्ये सुरू आहे. वैमानिकांसह एकूण ६० जणांना प्रशिक्षण दिले जात आहे. मे महिन्यात ही विमाने अंबाला येथील तळावर भारतीय हवाई दलात सामील करून घेतली जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर फ्रान्समध्ये प्रशिक्षण घेतलेले अधिकारी, सैनिक इतरांना प्रशिक्षित करतील, अशी माहिती एअरमार्शल अमित देव यांनी दिली.

### अध्यासनाची उद्दिष्टे

- राष्ट्रीय सुरक्षा व सशस्त्र दलाच्या भूमिकेत नागरिकांचा रस निर्माण करणे
- राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित समकालीन व भविष्यकालीन विषयांवर संशोधन व अभ्यास करणे
- चर्चासत्र, कार्यशाळांचे आयोजन
- हवाई दलासाठी खास इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांची निर्मिती

भारतीय हवाई दलातर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ‘मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग’ यांच्या नावाने अध्यासनाची स्थापना करण्यात आली. त्यासाठी हवाई दलाकडून एक कोटी रुपयांची देणगी देण्यात आली आहे. यासंदर्भातील सामंजस्य करारावर शनिवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, एअर व्हाईस मार्शल एल. एन. शर्मा, लोहगाव तळाचे प्रमुख एअर कमोडोर राहुल भसीन, एअर कमोडोर एस. पी. भंडारे, एअर चीफ मार्शल पी.व्ही. नाईक (नि.), एअर मार्शल भूषण गोखले (नि.) ग्रुप कॅप्टन शक्ती शर्मा, यांच्यासह आजी माजी अधिकारी या वेळी उपस्थित होते. विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे, ज्येष्ठ सामारिक तज्ज्ञ डॉ. श्रीकांत परांजपे हे देखील या वेळी उपस्थित होते.

‘सशस्त्र दलांच्या नेतृत्वाला शैक्षणिक संस्था, चिंतन गट (थिंक टँक) यांचा आधार उपयुक्त ठरतो. देशाची सुरक्षा नीती, धोरण हा सर्वंकष अभ्यासाचा विषय आहे. त्यासाठी सामरिक नीतीचा, आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. त्यासाठी अशी अध्यासने उपयुक्त ठरतील. सशस्त्र दलांमधील अधिकाऱ्यांना अशा अभ्यासासाठी वेळ मिळणेही शक्य होत नाही. त्यामुळे ज्यांना शक्य आहे, असे शैक्षणिक रजा घेऊन पूरक अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात व येथे मिळालेले ज्ञान सेवेदरम्यान प्रत्यक्षात आणू शकतात,’ असे देव यांनी सांगितले.

‘हवाई दलाच्या स्वत:च्या प्रशिक्षण संस्था आहेत. त्यात विविध अभ्यासक्रम चालविण्यात येतात. मात्र, त्यासाठी प्रत्येकाचीच निवड होत नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सामरिक शास्त्र विभागाला मोठा इतिहास आहे. येथील वातावरण वेगळे आहे. अनुभवी प्राध्यापक आहेत. तसे शिक्षण, वातावरण अधिकाऱ्यांना कदाचित हवाई दलाच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये अनुभवायला मिळणार नाही. अध्यासनाच्या स्थापनेबाबत हवाई दलातर्फे करण्यात आलेला हा पहिलाच करार आहे. अर्जन सिंग अध्यासन हे हवाई दलातील देशातील पहिलेच अध्यासन आहे. अर्जन सिंग यांच्या जन्मशताब्दी वर्षातच या अध्यासनाची स्थापना होणे औचित्यपूर्ण आहे. असेही देव यांनी नमूद केले. ‘सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि भारतीय सैन्यदलांचा जुना संबंध आहेत. सामरिकशास्त्र विभागातील विविध अभ्यासक्रमांना लष्करातील आजी-माजी अधिकारी प्रवेश घेतात. सामारिकशास्त्राशी संबंधित संशोधनावरही येथे भर दिला जातो. अर्जन सिंग यांच्या नावाचे नवे अध्यासन सुरू होणे ही बाब लौकिकात भर पाडणारी आहे. दरवर्षी हवाई दलाचे आठ अधिकारी येथे प्रवेश घेतील,’असे प्रा. डॉ. करमळकर यांनी सांगितले.